# गोदरेज सिक्युरिटीची 'ऑटोव्हॉल्ट' सुविधा

**मुंबई :** गोदरेज सिक्युरिटी सोल्युशन्सने बँकिंग सुरक्षिततेला अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत 'ऑटोव्हॉल्ट' सुविधा उपलब्ध केली आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत बुलडाणा नागरी सहकारी क्रेडिट सोसायटी लि.च्या उद्घाटन सोहळ्यात 'ऑटोव्हॉल्ट' या स्वयंचलित सेफ डिपॉझिट लॉकरचा शुभारंभ करण्यात आला. बहुस्तरीय सुरक्षा प्रणालीने सज्ज असलेल्या ऑटोव्हॉल्टमुळे ग्राहकांना कोणत्याही त्रासाविना तसेच कर्मचाऱ्यांच्या हस्तक्षेपाविना आपला मौल्यवान ऐवज कोणत्याही वेळी उपलब्ध होऊ शकेल.